ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# 'भारतीय इतिहासातील आधुनिकतेचा नवा संदर्भ'

**प्रा.डॉ.दिलीप तुकाराम कदम**
इतिहास विभाग कै.न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला
महाविद्यालय, मारवड, ता.अमळनेर जि.जळगांव

★★★

**प्रस्तावना** – आधुनिक भारताचा इतिहास हा अनेकांगी अर्थांनी वैशिष्टयेपुर्ण असा आहे. या इतिहासात वसाहत वादाविरूध्द झगडणारा राष्ट्रवाद आहे, शेतकरी, मजुर, स्त्रीयांच्या चळवळी आहेत. प्रभावशाली अशा दीर्घकाळ चालणाऱ्या दुहेरी सामाजिक चळवळी आहेत. त्या म्हणजे ब्राह्मणी आणि ब्राह्मणेत्तर अशा चळवळी होत. प्रस्तुत स्वातंत्र्य लढा यांची पदरेही अनेक स्वरूपाची अशी आहेत. हा स्वातंत्र्य लढा जितका परकीय राजवटी विरूध्दच्या जुलूमशाही विरूध्दचा होता, तितकाच किंबहुना त्यापेक्षाही तीव्र असा अंतर्गत अशा बाबींसाठी शतकानुशतकांचा होता. त्यामुळे हा आधुनिक भारताचा इतिहास हा चक्राकार अशा गतीचा वा स्वरूपाचा आहे. यात संदेह नाही.

**प्राचीन भारत** – सर्वप्रथम भायतीय इतिहासाला समजून घेण्याकरीता आपल्याला हे मान्य करावे लागते ही प्राचीन काळापासून भारत ही एक सातत्याने परकीय अशा राजवटींची भुमी राहिली आहे. त्यामुळे याच्या प्रत्येकातिहासात अशा राजवटींचा आपआपला प्रभाव पडला आहे. कोणतीही राजवट ही जरी सुरूवातीला राजकीय स्वरूपाची प्रभावशाली अशी राजवट असली तरी ती सर्वार्थाने तसीच असत नाही. त्यातंर्गत धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक असे त्यापेक्षाही प्रभावशाली असे घटक असतात. (थापर, 2000, प्रस्ता.) प्रस्तुत विचाराच्या स्पष्टीकरणादाखल प्राचीन भारताचे एक महत्वाचे उदाहरण देता येईल की, या काळात कनिश्कांनी आपली ग्रीक सत्ता येथे प्रभावीपणे उभी केली. आणि त्याच्या काळात सम्राट अशोकानंतरची दुसरी सर्वात प्रभावषाली अशी बौध्द धर्माला उभारी मिळाली. या त्याच्या सत्तेतून या बौध्द धर्मातील कला स्थापत्य प्रभावीपण उदय पावले. यांच्या काळात बौध्दांच्या प्रचंड मोठया अशा मुर्त्याच निर्माण झाल्या असे नाहीत तर या धम्माच्या बाबतीत त्याच्या धर्मग्रथांचे संकलन होऊन याचे पंथही उदय पावले. यांचे ग्रंथ स्पष्ट स्वरूपात पुढे आले. (गायधनी, राहूरीकर, 1998, 121) त्यामुळे त्यांच्या राजसत्तेचे आपण केलेले राजकीय विष्लेशण करून कदापी चालणार नाही. तो पर्यत तो अपुराच आहे.

**मध्ययुगीन भारत** – भारताच्या इतिहासात मध्यकाळात सुलतानशाही आणि मोगलषाही अशा तुर्कसत्ता भारतात आल्या या सत्तेचे स्वरूप विषद करताना कॉणशरद पाटील यांनी यास सांमती स्वरूपातच विषद केले आहे. (पाटील,1999, प्रस्ता.) आणि ते साधारपणे त्यांनी स्पष्ट करून दाखवले आहे. या मध्यकालीन भारतीय इतिहासात सातत्याने दारूल–उल–हर्ब अर्थात गैरइस्लाम आणि दारूल–उल–इस्लाम. इस्लाम भारत असेच स्थित्यंतर करण्याकडे सर्वच सत्ताधीशांचा कल होता. या मध्यकालीन भारताच्या बाबतीत एका इतिहासकाराने खुप मार्मिक असे विष्लेशण केले आहे की, या काळात या इस्लामी राजवटी भारतीय इतिहासाने स्विकारल्या याबाबत यात कोणताच निष्चित पर्याय नव्हता. परंतु जर का आपण सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर सुक्ष्मपणाने पाहिले तर, आपणास असे दिसूनयेते की, या काळात हिंदू धर्मावर इस्लामचा आणि इस्लाम ध र्मावर हिंदुचा प्रचंड प्रभाव पडला हा प्रभाव केवळ धर्म मुल्यांचा, विचारांचाच होता असे नाही तर हिंदुच्या घर, स्वयंपाक गृह इथपर्यत इस्लामी संस्कृती आली, तर इस्लामच्या बाबतही हाच हिंदुचा प्रभाव राहिला. यात उदा.राजपुतांनी त्यांची पडदा पध्दती घेतली. हिंदुनी खाद्य संस्कृती, मुस्लीमांनीही खान बान पध्दती, हा प्रभाव इतका गुंतागुंतीचा जरी पडला असला तरीही हे दोन्ही धर्म कायम स्वरूपात निरनिराळेच असे राहिले. आणि त्यांनी या प्रभावासह आपले निराळेपणा टिकवून ठेवला होता. (हबीब, 2002, 123)

**आधुनिक भारत** – 18 व्या शतकात ज्यावेळी ब्रिटीशांनी भारतात आपले व्यापारवादी पाऊल ठेवले होते. आणि लवकरच त्यांच्या व्यापारवादाला सत्ता स्थापनेची सुसंधी चालून गेली. या काळात भारतीय इतिहासाच्या दुर्दैवाने एकही केंद्रीभूत अशी सत्ता नव्हती. सर्वच प्रादेशीक सत्ता होत्या यासाठी सत्तांची आपापली स्पर्धात्मक अशी कार्यक्षेत्र होती. त्यामुहे त्यांची सतत स्वतःच जुंपत होती. या सर्व स्थितीचा ब्रिटीशांनी जबर फायदा झाला. आणि आपल्या आपल्या येथील शाळांच्या पुस्तकामध्ये व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. (जावडेकर,1998,47) अशी उक्ती बनली. मुळात यामागे दीर्घ अशा सत्तांतराचा आणि भारतीय इतिहास अवस्थांतराचाच अधिक संदर्भ आहे. हे आपण समजून घेतले पाहिजे.

ब्रिटीश कालीन भारत समजून घ्यायला आपल्याला बऱ्याच सुक्ष्म अशा संकल्पना समजून घ्याव्या लागतात. यापैकी सर्वात महत्वाची संकल्पना म्हणजे राष्ट्रवादाची होय. प्राचीन मध्ययुगीन काळापासून जरी भारत हे एकसंघ राष्ट्र असा जरी इतिहास असला तरी दुसरी वस्तुस्थिती अशी आहे की ज्यावेळी हा ब्रिटीशांच्या हाती गेला त्यावेळी वर उल्लेख केल्याप्रमाणे हा प्रादेशीक सत्ताचा देश होता. ही ब्रिटीश सत्ता कार्यरत असतांना त्यांनी एकीकडे येथील सत्तांना अंकीकष्त करून दुसरीकडे प्रत्यक्ष ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता अशा दुहेरी पध्दतीने आपल्या सत्तेचे बस्तान निर्माण केले होते. (चंद्रा,1990,12) 18 व्या शतकातील भारत आणि त्यांची ही वैविधता या बाबतीत ब्रिटीष इतिहासकाराने असे म्हटले आहे की, भारत हे आपल्यामध्येच

एक विष्व प्रतिकष्ती आहे. विष्वात जेवढया भाषा, संस्कष्ती, सांस्कृतिक बाबी आहेत, असतील त्यापेक्षाही भारतामध्ये वैविध्यता अधिक आहे. (चंद्रा, 2000, 70) एवढेच नव्हे तर ज्यावेळी भारताला स्वातंत्र्य देण्याची प्रत्यक्ष वेळ येवून ठेपली होती, त्यावेळी ब्रिटीष पंतप्रधान चर्चील, याने असे म्हटले होती की, भारतात कदापीही स्वातंत्र्य टिकवून राहणार नाही आणि यापेक्षाही या देशात कधीच लोकशाही नांदू शकणार नाही. *India is not capable for Democracy and Freedom* आणि कदाचित भारत परत या ब्रिटनसत्तेला त्याच्या भविष्याकरीता बोलविल असाच त्याचा अविर्भाव कायम होता. वरील स्पष्टीकरणावरून हे स्पष्ट होतेच की, प्राचीन काळापासून भारतीय इतिहासाला परकीय अशा राजवटींची त्यांच्या प्रभावाची दीर्घ अशी परंपरा आहे. तरीही आधुनिक भारताचा इतिहास हा निष्चितपणे या दोन्ही काळा पैसा निराळा आणि अभिजात असाच आहे. आधुनिक भारत आणि याच्या जाणिवा ब्वदेबपवनेदमे या निष्चितपणे ब्रिटीष केंद्रीत जरी असल्या तरी त्या खुप पुढे जावून राष्ट्रनिर्मितीच्याही पुढे स्वयंभू राष्ट्रवाद (Ultimate Nationalism) या परिघाच्या होत्या. यामध् ये त्यांनी आतापर्यंतचा सर्वच प्रभाव बाजुला सारत भारतीय संविध ाानातील शब्द सार्वभौम या सम हा निर्माण होत गेला (सरकार,2002,24) हे या आधुनिक भारतीय इतिहासाचे अभिजात असे वैशिष्टये आहे.

**आधुनिक भारताचे वैशिष्ठ्ये** – आधुनिक भारताचे दीर्घ असे वैशिष्टये आहेत यांची विस्तृत अशी मांडणी प्रो.बिपन चंद्रा (1928–2014) यांनी आपल्या आधुनिक भारताच्या इतिहास मांडणीत केली आहे. यांनीच आपल्या लेखनातून आर्थिक राष्ट्रवादाच्या सिध्दांताची प्रखर अशी सैध्दांतिक मांडणी केली.

1) लोकशाहीत्मक संवैधानिक लढा.

2) सामाजिक सुधारणांचा लढा.

3) कामगार हिताच्या संघर्शाचा लढा.

4) स्त्रियांच्या हित, सुधारणांचा लढा.

5) ब्राह्मण, ब्राह्मणेत्तर सुधारणा.

6) जातीच्या शोषणाचा लढा.

7) सामंतशाही विरूध्दचा लढा.

8) प्रादेशिक सत्ता व त्याविरूध्दच्या शोषणाविरूध्दचा लढा.
9) स्थानिक सरकार शोषणाविरूध्दचा आदिवासींचा लढा.
10) जंगल बचाव पर्यावरणाचा संरक्षणाचा इतिहास.

या प्रकारची सर्वच वैशिष्टये विषद करतांना प्रो.चंद्रा यांनी सरतेशेवटी सर्वात महत्वाचे असे आधुनिक भारताच्या इतिहासाचे आणखी एक वैशिष्टये प्रस्तुत केले आहे. ते म्हणजे म.गांधी आणि त्यांच्या लढा आणि विचारदर्शन होय. म.गांधी आणि त्याच्या दृष्टीने प्रस्तुत होणारे गांधीवादाचे दर्शन सत्य आणि अहिंसा हे प्रो.चंद्रा हे आधुनिक भारताने जगाला दिलेली अपूर्व अशी देणगी आहे. असे त्यांनी मांडले आहे. त्यांच्या मते गांधीवादाच्या अंगाने आधुनिक भारतातील क्रमिकरित्या झालेल्या तीन चळवळी या अत्यंत संगत अषाच स्वरूपाच्या आणि महत्वपूर्ण आहेत. गांधीनी खऱ्या अर्थाने आधुनिक भारताची सर्वकश निर्मिती केली आणि जगातील सर्वात प्रखर अशा साम्राज्यवादी सत्तेविरूध्द भीती भारतीयांच्या मनामधून त्यांनी कायमची काढून टाकली. (चंद्रा,2000,112 )

**आधुनिक भारताच्या इतिहासातील दोशस्थळे** – आधुनिक भारताच्या इतिहास हया अनेकांगी बाबीत वैशिष्टये पुर्ण अस असला तरीही या इतिहासात ब्रिटीश सत्ता या अर्थाने अनेक दोशस्थळे आपणांस निष्चितपणे दिसून येतात ती पुढीलप्रमाणे

1) भारतीय इतिहासात कधीच नव्हे त्या पातळीवर जमातवाद फोफावला.

2) हिंदु मुस्लीम जमातवादाने प्रखरता प्रस्तुत केली.

3) जातीय तत्वावर मतदार संघ निर्मित झाले.

4) लोकशाही लढयाला अनेक दिव्यातून जावे लागले.

5) हिंदु मुस्लीमांतील मध्यस्थ वर्ग ब्रिटीश धार्जिणा होता.

6) शेतकऱ्यांचे अतोनात शोषण झाले.

7) वर्ण व जातीने प्रखर स्वरूप धारण केले.

8) भारताचे दोन देशात विभाजन झाले. अशा प्रकारे आपणास स्पष्ट करता येते.

**आधुनिक भारतातून येणारे इतिहास भान** – आधुनिक भारताच्या इतिहासातून निष्चितपणे आपल्याला प्रभावी असे इतिहासभान प्राप्त होते. यात संदेह नाही. यातून आपल्या आधुनिक भारत या इतिहासाची एक प्रभावषाली अशा राष्ट्राची निर्मिती झाली. भारतात सातत्याने सामाजिक सुधारणांना प्रभावी असा प्रत्यक्ष अवकाश प्राप्त झाला होता. हिंदु मुस्लीम हा जरी जमातवाद निर्माण झाला असला तरी या वेळोवेळी हे दोन्ही समाज जिथे गरज पडेल त्या ठिकाणी येतील. सांस्कषतिक मूल्ये हा ऐतिहासिक ठेवा गृहित धरून हे दोन्ही समाज धर्म एकत्रितपणे लढले. उदा. वंगभंग चळवळ, चलेजाव चळवळ, असहकार चळवळ इ. (वैद्य, कोठेकर, 1998,124)

**निष्कर्ष** –

1) आधुनिक भारताचा इतिहास हा अभिजात आणि वैशिष्टपुर्ण असाच आहे.

2) हा लढा जितका परकीय सत्तेविरूध्दचा होता तितकाच तो अनादिकाळापासूनचा सामाजिक आणि सांस्कृतिक बाबींचा होता.

3) या इतिहासात जिथे एकीकडे गांधीवाद हा अभिजात आहे. तद्वतच आंबेडकरवाद ही येथील शोषणाविरूध्दचा अविष्कार आहे.

4) संवैधानिक लढा आहे.

5) हा लढा एकीकरणाच्या चळवळींचा आहे.

6) देशातील आर्थिक प्रगती, औद्योगिकरणांचा आहे.

थोडक्यात संबंध युरोपच्या इतिहासात जेवढे म्हणून प्रभावशाली विजय आणि ज्यामुळे युरोपचा इतिहास समृध्द आहे ते सारेच विषय या आधुनिक भारताच्या इतिहासात प्रस्तुत आहेतच.

***संदर्भ –***

*1) चंद्रा, बिपन 1990 – आधुनिक भारत का इतिहास, हिंदू विश्वविद्यालय, दिल्ली.*
*2) पाटील शरद 1999 –सामंती सेवकत्व, सुगावा प्रकाशन, पुणे.*
*3) जावडेकर श द. 1998– आधुनिक भारत कॉन्टीनेन्टल प्रकाशन,*
*4) थापर रोमिल 2000 – प्राचीन भारत, ग्रंथशिल्पी, नई दिल्ली*
*5) हबिब, इरफान 2002 – मध्ययुगीन भारत, राजकमल, नई दिल्ली*
*6) गायधनी राहुरीकर 1998 – प्राचीन भारत, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे*
*7) सरकार सुमित – आधुनिक भारत, मॅकमिलन प्रकाशन, दिल्ली*
*8) रॉय, सत्या 2019 – आधुनिक भारत, दिल्ली विष्वविद्यालय, नई दिल्ली*
*9) वैद्य, कोठेकर 1998 –आधुनिक भारत, साईनाथ प्रकाशन नागपूर*